Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 3.4052(UIF)
Volume-4 | Issue-7 | Jan-2015
Available online at www.aygrt.isrj.org

GRT

# यशवंतराव चव्हाण यांचे राजकीय नेतृत्वाविषयीचे विचार

**मारूती हजारे**

सं.भी.पाटील महाविद्यालय मंद्रुप

**सारांश** -राज्य आणि राष्ट्रीय पातळीवरील राजकारणात एक प्रगल्भ आणि नैतीक मुल्ये पाळणारा सभ्य नेता, विचारवंत साहित्यिक, कलाप्रेमी, ग्रंथपेमी म्हणून ज्यांचे सार्थ वर्णन केले जाते अशा यशवंतराव चव्हाण यांचे विचार व कार्य आजही प्रत्येक भारतीय नागरिक आणि लोकप्रतिनिधी यांना मार्गदर्शक आहे. यशवंतराव एका सामान्य कुटूंबात जन्माला आले आणि सामान्य कार्यकर्ता, जिल्हा काँग्रेस अध्यक्ष, आमदार, अन्न व नागरी पुरवठा मंत्री , मुख्यमंत्री, देशाचे संरक्षण मंत्री, गृहमंत्री, अर्थमंत्री, परराष्ट्रमंत्री, उपपंतप्रधान आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेता पदापर्यंत पोहाचले. या विविध पदांच्या माध्यमांतून त्यांनी आपले नेतृत्व सिध्द केले.

## प्रस्तावना

चौफर वाचन, चर्चा आाणि चिंतन, महात्मा फुले, एम.एन.रॉय, वि.रा.शिंदे, महात्मा गांधी, पंडीत नेहरू यांसारख्या सामाजिक आणि राजकीय नेतृत्वाचा आदर्श आणि आसपास घडणाऱ्या विविध परिवर्तनवादी चळवळीच्या माध्यमातून त्यांची वैचारिक जडणघडण झाली होती. नेता म्हणजे काय, नेतृत्व म्हणजे काय, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रातील नेतृत्व कसे असावे, नेता आणि जनता यांच्यामधील परस्पर संबंध कसे असावेत याविषयीचे त्यांचे विचार स्वत:च्या आचरणातून, भाषणांमधून आणि साहित्यकृती मधून स्पष्ट होताना दिसून येतात. हे विचार त्यांनी आयुष्यभर जोपासले व स्वत:च्या आचरणात आणले म्हणूनच ते खूप मोठे नेते झाले असे म्हणता येईल.

## उद्देश :

प्रस्तुत शोध निबंधाचे उद्देश खालीलप्रमाणे आहेत.

१) यशवंतराव चव्हाण यांचे राजकीय नेतृत्वाविषयीचे विचार समजून घेणे.

२) यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाच्या गुणवैशिष्ट्यांचा अभ्यास करणे.

३) महाराष्ट्राच्या व भारताच्या भविष्यकालीन राजकीय समस्यांच्या संदर्भात यशवंतराव चव्हाण यांचे नेतृत्वाबाबतचे विचार कसे उपयुक्त व संयुक्तिक आहेत याविषयी मांडणी करणे.

## यशवंतराव चव्हाण यांची नेतृत्वाबाबतची कल्पना

यशवंतराव चव्हाण यांची नतृत्वाबाबतची कल्पना अतिशय व्यापक होती. नेतृत्वाबाबत ते असे म्हणतात की, ‘‘ आजकालचे नेतृत्व याचा अर्थ फारच मर्यादितपणे केला जातो. राजकारणात एखादे पद प्राप्त झाले की, त्याला नेता म्हणायचे ही सवय जितक्या लवकर दूर होईल, तितकी त्याची गरज आहे... नेतृत्व हा शब्द व्यापक अर्थाचा आहे... सामूहिक परिणाम घडविणारे त्या त्या क्षेत्रातील जे कोणी आदर्श असतील तेच

खरे नेते. नव्या आदर्शांचा संपूर्ण समाज जीवनावर परिणाम करण्यासाठी, त्याचा वापर करणारी जी माणसे असतात, त्याच्या ठिकाणीही नेतृत्व असते. विचारांची, माणसांच्या मनाची मशागत करणे आणि त्यांचे आदर्श परिणाम घडवून आणणे या नेतृत्वाच्या कसोट्या असतात.'' [१]

नेता म्हणजे काय, याचे स्पष्टीकरण देताना यशवंतराव चव्हाण म्हणतात की, लोकांना योग्य ठिकाणी नेतो तो नेता होय. उदात्त उदाहरण घालून देणे, प्रथम प्रात्यक्षिक निर्माण करणे म्हणजे नेता होय. कोणत्याही समस्येत नेता स्वत: अग्रभागी असावा लागतो. नेता असणाऱ्याला सर्वांच्या पुढे असावे लागते नेता असणाऱ्याला सर्वांच्या शिरोभागी असावे लागते. सर्वांच्या शिरोभागी म्हणजे प्रत्यक्ष डोक्यावर नव्हे. नेता जर डोक्यावर बसू लागला तर त्याला ज्यांचे नेतृत्व करायचे आहे त्यांच्या भावना, आशा, आकांक्षा समजायला वेळ लागतो. असे घडले तर त्या नेतृत्वाबद्दलचा आदर संपुष्टात येतो. इतकेच नव्हे तर नेतृत्वही संपुष्टात येते. ज्याला नेतृत्व करायचे आहे त्याने ही पथ्थे पाळली पाहिजेत.

**यशवंतराव चव्हाण यांचे राजकीय नेतृत्वाविषयीचे विचार**

**१) नेता नितीमान असावा लागतो -**

यशवंतरावांचे असे मत होते की, ''नेतृत्ववाने ध्येयाचा ध्रुवतारा गाठण्यासाठी बांधिलकीच्या राजकारणाची भूमिका घेतली पाहिजे. मौलिक व पायाभूत गोष्टींचा मागोवा घेतल्यानेच हे साधता येईल.'' यशवंतरावांच्या मते मानवी प्रवृत्ती व दृष्टीकोन हे निरनिराळ्या काळात बदलत असले तरी मानवी मूल्ये ही चिरंतन टिकणारी आहेत. मानवी जीवनास आधारभूत असलेली ही मूल्ये सर्व काळात आणि सर्व देशात उपयुक्त ठरली आहेत. अखंडपणे वाहत असलेल्या कालप्रवाहात निश्चल अशा दिपस्तंभाप्रमाणे मानव जातीला सतत प्रकाश देत राहिलेली ही मूल्ये प्राचीन काळापासून आजतागायत तशीच आहेत.

यशवंतरावांनी महात्मा गांधी प्रमाणे राजकारणामध्ये साध्याइतकेच साधनाला महत्त्व दिलेले दिसून येते. त्यांनी स्वत:च्या व्यक्तीगत गुणांच्या आधारे अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत आपले नेतृत्व सिध्द केले. कोणत्याही परिस्थितीत ते प्रवाहपतीत झाले नाहीत. ते स्वत:च्या विचाराशी ठाम राहिले. त्यांनी आपल्या वैयक्तिक व सार्वजनिक जीवनात नितीची तत्त्वे पाळली. कोणत्याही अमिषाला, भ्रष्टाचाराला बळी पडले नाहीत, मृत्यूसमयी त्यांच्या नावावर फक्त एक घर होते. साधेपणा हा त्यांच्या आयुष्याचा सर्वात मोठा गुण होता. यासंबधी महात्मा गांधींचा प्रभाव त्यांच्यावरती होता. त्यांनी वैयक्तिक व सार्वजनिक जीवनात अतिशय मापक अपेक्षा ठेवल्या. अत्यंत कमी खर्चात ते जगले. 'नेता नितीमान असावा लागतो.' हे त्यांचे वाक्य आजच्या काळात जास्त अधोरेखीत करावे लागते. आज नितीमान नेते शोधूनही सापडणार नाहोत.

**२) नेता चारित्र्यसंपन्न असावा लागतो ड्ढ**

यशवंतराव चव्हाणांना महाराष्ट्रातील नेतृत्वाकडून आधुनिक महाराष्ट्र घडवायचा होतो. ज्यासाठी त्यांनी शीलवान नेतृत्वाची आवश्यकता प्रतिपादिली होती. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीच्यावेळी ते आपल्या सहकार्यांना उद्देशून म्हणतात, ''मो जे नेतृत्व म्हणतो त्याचा अर्थ आपण नीट समजावून घ्या, नव्या नेतृत्वाकरिता निश्चित कार्यक्रम असावा लागतो, कार्याची दृष्टि असावी लागते आणि त्याच बरोबर समाज समतेच्या तत्त्वावर चालण्याकरिता, कार्याला वाहून घेणाऱ्या शीलवान शूरांची आवश्यकता असते.''[२] यशवंतरावांच्या मते, नतृत्त्वाने स्वत:चे चारित्र्य तर जपलेच पाहिजे पण दुसऱ्याच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवू नयेत. त्यांच्या मते, ''चारित्र्यहननाची कल्पना केवळ लोकशाहीशीच विसंगत आहे असे नसून, व्यक्तीगत जीवनात पाळावयाच्या शिष्टसंमत संकेताशीही ती विसंगत आहे आणि म्हणूनच हा मार्ग केंव्हाही त्याज्य व निषेधार्हच आहे सभ्यतेच्या मर्यादा ओलांडणारा हा प्रकार हिडीस व ओंगळवाणा आहे. असे प्रकार थांबलेच पाहिजेत.''[३]

यशवंतराव यांच्या राजकीय चारित्र्याबद्दल जेष्ठ विचारवंत प्रा. एन.डी.पाटील असे म्हणतात की, ''यशवंतराव चव्हाण यांचे सार्वजनिक आणि वैयक्तिक चारित्र्य विलोभनोय आणि आदर्शवादी होते. आजच्या राज्यकर्त्यांच्या कोट्यावधी संपत्तीच्या बातम्या येतात. या सर्वांपासून यशवंतराव दूर होते. त्यांनी आपल्या उभ्या जीवनात सार्वजनिक आणि वैयक्तीक चारित्र्य सांभाळण्याचा प्रयत्न केला. अशा प्रकारचे आज फार कमी लोक आहेत. त्यापैकी यशवंतराव चव्हाण एक आहेत.''[४]

**३) नेतृत्वाकडे निश्चित विचारसरणी आणि प्रयत्नांची गरज असते ड्ढ**

त्यांच्या मते नेतृत्व जर हेतूपूर्ण नसेल तर ते कुचकामी ठरते. नेतृत्वाला स्वार्थापलिकडचे काही ना काही प्रयोजन असावे लागते. ज्या समाजामध्ये आपण वाढलो त्या समाजव्यवस्थेचा आदर्श आराखडा आपल्यासमोर असायला हवा. तिथपर्यंत पोहोचण्यासाठी आपल्याला निश्चित

दिशा आवश्यक आहे. ''राज्यकारभार करीत असताना प्रश्न जस जसे उद्भवतील तस तसे ते सोडवीत जावयाचे याला काही योजनाबद्ध राजकारभार म्हणता येणार नाही. तर त्यासाठी विचारपूर्वक अशा काही पध्दती काही तत्त्वे निश्चित करून त्याप्रमाणे जर आम्ही काम करीत गेलो, तर त्याला योजनाबद्व राज्यकारभाराचे स्वरूप प्राप्त होईल. या दृष्टीने राज्यकारभाराच्या बाबतीत आपल्या कांही मुलभूत कल्पना असतील तर त्या स्पष्टपणे सांगितल्या पाहिजेत.''[५] यशवंतरावांच्या मते धंदेवाईक राजकारणी आणि धंदेवाईक प्रशासक निरनिराळ्या पातळीवर कार्य करीत असले आणि त्यांच्या कार्याच्या पध्दती व साधने भिन्न असली तरी लोकशाहीमध्ये त्यांना मार्गदर्शन करणारी शक्ति व तत्त्वे एकच असतात.

**४) राजकीय प्रश्नांची योग्य जाणीव हवी ङ्क**

यशवंतराव चव्हाणांच्या मते, राजकारणातील प्रश्न जर आपणास सोडवायचे असतील तर त्यांचे स्वरूप आपण नीट समजावून घेतले पाहिजे... प्रश्नाचे पृथ:करण करून त्यांची उलटसुलट बाजू लोकांच्या पुढे मांडली पाहिजे... प्रश्नांची उकल आम्हाला कोणत्या पध्दतीन करावयास पाहिजे याचा आराखडा जर आम्ही विचारपूर्वक आमच्यापुढे ठेवला नाही तर आंधळ्यासारखा प्रवास करण्याचा प्रसंग आमच्यावर येईल... निश्चित ठिकाणी जाण्यासाठी आम्हाला हा प्रवास करायचा आहे, आणि एका निश्चित गतीने पूरा करायचा आहे.''[६] राजकीय आव्हांनांचा आपण जिद्दीने स्विकार केला पाहिजे... कारण आव्हाने नेहमीच असतात. आव्हाने नसतील तर वैयक्तिक व सार्वजनिक जीवन बेचव होवून जाते. आव्हानांना घाबरलो की सारे कांही गमावून बसतो. पण जर का त्यांना धैर्याने तोंड दिले तर आपण यशस्वी होवू शकतो. जे वैयक्तिक जीवनाबाबत खरे आहे तेच राष्ट्राच्या जीवनाबाबतही खरे आहे.[७]

**५) नेतृत्वाने प्रश्न सोडविण्यासाठी प्राधान्यक्रम ठरवावा लागतो-**

लोकांच्या आशा, आकांक्षा, त्यांचे प्रश्न व मागण्या यांचा अभ्यास करून त्या सर्वांना मूर्त स्वरूप देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. राजकीय नेतृत्वाने हे लक्षात ठेवले पाहिजे की ''देशापुढे उपस्थित होणारे प्रश्न सोडविण्याचे आणि देशाचा विकास आणि समृध्दि घडवून आणण्याचे राज्य हे एक साधन आहे. जनहिताचे प्रश्न त्वरीत सोडविता यावे व राज्याचा विकास साधावा या दृष्टिने राज्य व राज्ययंत्रणा प्रयत्न करीत असते. त्यादृष्टीने राज्याचा एक प्रभावी साधन म्हणून आम्ही वापर करीत असून जनतेचे प्रश्न शक्य तितक्या लवकर त्वरीत सुटून हे राज्य आपल्या सर्वांचे कसे होईल याचा विचार केला पाहिजे.''[७] राजकीय नेतृत्ववान व्यापक स्वरूपाची योजना आखाण्याचा प्रयत्न केला पाहिजे. समाजाच्या मुलभूत प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी, आर्थिक व सामाजिक विकासाच्या निश्चित कार्यक्रमाचा आराखडा तयार करणे, देशाची राष्ट्रीय संपत्ती वाढवून संपत्ती व उत्पन्न यांच्यात समता प्रस्थापित करणे आणि झालेल्या विकासाचा लाभ देशातील तरूणांनाही वाटला जात आहे, हे दाखवून देणे अशी महत्त्वाची कार्ये नेतृत्वाला शक्य करून दाखवावी लागतील. लोकांच्या आकांक्षाशी निगडीत असलेला कार्यक्रम तातडीने अंमलात आणण्याचा आपल्याला कसोशीने प्रयत्न केला पाहिजे. ''लोकांचे कल्याण करण्याचे सत्ता हे एक साधन आहे, याचाच आपल्याला विसर पडला. सत्ता हे आपले एकमेव उद्दिष्ट झाले. सत्ताग्रहण केल्यानंतर आपल्या देशातील कोट्यावधी अर्धपोटी आणि अपुऱ्या कपड्यात राहणाऱ्या जनतेची दरावस्था नाहीशी करण्याची आपल्यावर जबाबदारी आहे, हे ध्यानातच घेतली नाही.

**६) जनसंपर्क महत्वाचा मानावा :-**

''राजकीय समज किंवा योग्य तो निर्णय घेण्याची क्षमता ही काही साक्षरतेवर अवलंबून नसते. मला वाटते, शिक्षणानेही एक प्रकारचा न्यूनगंड येतो. आपले समाजाच्या अतर्मनाशी असणारे संबंध तुटतात. बावळ्या वेषातील फाटकी वस्त्रे घातलेली दीन दिसणारी माणसेही प्रचंड धक्का देऊ शकतात, राजवटी कोलमडवू शकतात, राज्यकर्त्यांना व राजकीय पक्षांना धडा शिकवितात''.[९] यशवंतरावाच्या मते लोकशाहीतील नेतृत्वाने पुढील गोष्ट लक्षात ठेवावी को, ''लोकशाही हे अग्निदिव्य आहे. निवडणुकाही त्याचाच एक भाग. राज्यकर्त्यासकट सर्वांनी जनतेपुढे जायला हवे, ते टाळता येणार नाही. म्हणून मला त्यावेळी वाटते. की, निवडणुक ही, समाज ढवळून काढणारी प्रक्रिया आहे. त्यासाठो राज्यकर्त्यांनी सदैव तयार असलेच पाहिजे''[८]. यशवंतरावाच्या मते, ''क्रियाशून्य चर्चा करणारा पंडीत होवून कोणालाही राज्यकर्त्याची भूमिका करता येईल. असे वाटत नाही. राज्य करणारा पुढारी हा समाजाच्या विविध प्रश्नांची उकल, जसे हे प्रश्न पुढे येतील, तशी करीत जातो. त्याची स्वत:ची पोथीनिष्ठ किंवा सैध्दांतिक विचारसरणी पुढे ठेवून किंवा त्याच्या चौकटीत राहून त्याला समाजाचे प्रश्न सोडविता येणार नाहीत.[१०]''

### ७) नेतृत्व सर्वसमावेशक आणि विश्वसाहर्य असावे :-

यशवंतराव चव्हाणांना सर्वसमावेशक आणि विश्वसाहर्य नेतृत्व अपेक्षित होते. त्यांच्या कल्पनेतील लोकशाही नेतत्वाचे ते पैलू होते. ''राजकारणामध्ये केवळ वैयक्तिक महत्वकांक्षा बाळगून यश मिळत नाही. म्हणून महत्वाकांक्षेच्या मोहजालात राजकरण्यांनी फारसे पडू नये असे ते सांगतात. या उलट नेतृत्व हे सर्वसमावेशक असावे. सर्व सामाजिक थरांचा विकास असलेले व सर्व सामाजिक थरांना विशेषत: खालच्या मानल्या गेलेल्या थरातील कार्यकर्त्यांना विश्वसाहर्य वाटणारे व कार्याच्या भागीदारीत भाग घेणारे नवे सामाजिक नेतृत्व होय असे यशवंतरावांना वाटते. यशवंतराव पुढे असे प्रतिपादन करतात की, निरनिराळ्या पातळीवर लोकशाही संस्था निर्माण झाल्याशिवाय आपण लोकशाही नेतृत्व निर्माण करु शकत नाही. लहानलहान क्षेत्रात काम करणाऱ्या लोकशाही संस्थातूनच भावी नेते तयार होतील''[११] यशवंतरावांनी नेहमी स्वत:च्या मर्यादा ओळखून नेतृत्व केले.

### ८) लोकांचे समाधान हीच चांगल्या राज्यकारभाराची खरी कसोटी मानवी :-

''लोकशाही राज्यकारभारामध्ये, मी चांगले काम करतो, लोकांच्या उपयोगाचे काम करतो एवढी कसोटी अपुरी आहे. काम चांगले तर केलेच पाहिजे, पण काम चांगल्या प्रकारे झाले आहे याची लोकांना प्रचीति आली पाहिजे, लोकांना ते जाणवले पाहिजे. म्हणूनच मी म्हणतो की, राज्यकारभाराची खरी कसोटी लोकांच्या समाधानात आहे. सरकार चांगले असून उपयोग नाही, तर सरकार चांगले आहे, राज्यकारभार चांगला चालला आहे असे लोकांना वाटले पाहिजे, जाणवले पाहिजे'' यशवंतराव असे म्हणतात की, ''मला आणि तुम्हाला काय वाटते, यापेक्षा सर्वसामान्य लोकाना राज्यकाराभारासंबंधी काय वाटते, लोकांना त्यापासून कितपत समाधान मिळते, ही खरी मोठी कसोटी आहे. आम्ही हीच अंतिम कसोटी मानली पाहिजे आणि याच कसोटीवर यापुढील राज्यकारभाराची परीक्षा पाहिली जाणार आहे.''[१३]

''देशहिताच्या आणि जनकल्याणाच्या प्रेरणेशी नेतृत्वाने समरस व एकरुप होवून आपल्याकडे कोणत्या जबाबदाऱ्या येतात हे ओळखून त्या पार पाडल्या पाहिजेत. यासाठी प्रामाणिकपणे व बुध्दीच्या व भावनेच्या निष्ठेने प्रयत्न करणे गरजेचे आहे असे यशवंतराव चव्हाण म्हणतात''.

### ९) अहिंसेच्या व घटनात्मक मार्गावर विश्वास असला पाहिजे :-

''यशवंतरावांच्या मते राजकीय नेतृत्व, पक्ष संघटना त्या ज्या समाजगटांचे हितरक्षण करतात, त्याचबरोबर संपूर्ण समजाच्या हितसंबंधाची आणि आकांक्षाची जपणूक करतील. विचार किंवा हितसंबंध यात संघर्ष निर्माण झाला, तर त्यात वावगे असे काहीच नाही. परंतु विधिमंडळामध्ये, सभागृहामध्ये सार्वजनिक सभांमध्ये किंवा वर्तमानपत्रांमध्ये या संबंधीची चर्चा होण्याऐवजी, रस्त्यावर हिंसाचाराची भाषा घुमू लागली, तर स्वतंत्र समाजातील राजकीय यंत्रणांवर भलताच ताण पडेल. हिंसेला हिंसेने उत्तर देण्याच्या प्रवृत्तीमुळे दहशतीचे वातावरण निर्माण होते.''[१४] सामाजिक व राजकीय बदल हे हिंसेशिवाय घडणार नाहीत, अशी दृढ श्रध्दा असणाऱ्या लोकांचे प्रमाण कमी आहे व ते असंघटीत आहेत. परंतु या प्रश्नाचा गंभीरपणे व साकल्याने विचार न झाल्यास सार्वत्रिक हिंसाचार करण्या इतके त्यांचे सामर्थ्य वाढू शकेल. हे आपण विसरुन चालणार नाही. या संदर्भात लोकशाहीच्या मार्गाने समाजवादी रचनेची शपथ घेतलेल्या राजकीय नेतृत्व व पक्षावर जास्त जबाबदारी आहे. त्यासाठी लोकारंचे मत परिवर्तन केले पाहिजे. तसेच हिंसाचारावर विश्वास ठेवणाऱ्या ध्येयप्रणालीपासून लोकांना परावृत्त करावयाचे असेल, तर ज्या लोकमानसात अशा हिंसात्मक ध्येयवादाचा प्रभाव पडतो, त्याच्यावर लोकाशहीचे परिणामकारक संस्कार करीत राहिले पाहिजे. लोकशाही पध्दतीची श्रेष्ठता लोकांना पटवून दिली पाहिजे. सामाजिक न्याय व समता यांचे आश्वासन देणाऱ्या समाजवादी शक्तीवर दृढ श्रध्दा असलेली लोकशाहीच अशा हिंसाचारी ध्येय प्रणालोशी मुकाबला करु शकेल.''[१५]

### १०) लोकशाहीच्या तत्वावर दृढ विश्वास असावा:-

''लोकशाही जमान्यात नेतृत्व करताना नेतृत्व करणाऱ्या नेत्याने लोकशाही म्हणजे लोकसंस्था आहे. याचा विसर पडू देऊ नये. लोकशाहीत जो नेता लोकांशी निरंतर संलग्न राहून लोकांचा आणि स्वत:चा आत्मविश्वास वाढवतो, त्यालाच लोक आराध्य दैवत मानतात, लोक व नेता यांच्यात खरेखुरे तादात्म्य नांदले, तर नेत्याच्या शब्दाला ब्रह्मवाक्याचे रुप प्राप्त होते.'' [१६] दुसरी महत्वाची गोष्ट यशवंतराव चव्हांणांनी

नेतृत्वाबद्दल सांगितली ती अशी की, नेत्याने सर्वसामान्य लोकांशो भावनिकदृष्ट्या एकजीव झाले पाहिजे. त्यांच्या मते लोक आणि नेता यांच्यामधील आंतर नष्ट झाले पाहिजे''.

**११) आत्मनिरीक्षण व आत्मपरीक्षणाची आवश्यकता :-**

''सत्ता राजकीय असो की आर्थिक असो, सत्ता हे मोठे सामर्थ्य आहे. सत्तेचे हे स्थान लोकांच्या कल्याणासाठी उभारलेली एक वेदी आहे. एक यंत्रणा आहे. ते एक मोठे जोखमीचे काम आहे ही जाणीव सतत आपल्या मनात असली पाहिजे. यासाठी एकच मार्ग आले आणि तो हा की, आपले हे काम लोकशाहीच्या पध्दतीने चालले आहे की नाही, याचे कठोर आत्मनिरिक्षण नित्य झाले पाहिजे''.[१७] ज्यांच्या अंगी आत्मपरीक्षणाची अपरिहार्य, आवश्यक अशी क्षमता नाही, त्याला फारसे उज्वल भविष्यही नाही. पण आत्मपरीक्षणाची ही दृष्टी समतोलच ठेवायला हवी. आत्मपरीक्षण वस्तुनिष्ठ असले पाहिजे. ''वैयक्तिक जीवनामध्ये जशी आपण प्रगति करतो तशीच ती सार्वजनिक जीवनतही करावयाची असते. राज्यकारभारामध्ये सुधारणा व प्रगती करण्याचे ठरवून तुम्ही आणि मी जरी काम करणार असलो तरी आत्मसंशोधनाची, आत्मटिकेची आपल्याला फार जरुरी असते. राज्यकारभार चांगला करावयाचा असेल तर तो चांगला करण्याची सतत काळजी घेतली पाहिजे.[१८]

**१२) संघटना व सामुहिक प्रयत्नाची गरज :-**

''एका राज्याचा प्रमुख म्हणून मला जी जबादारी पार पाडायची आहे, ती मी एकटाच पार पाडू शकणार नाही हे उघड आहे. हे काम करण्यासाठी आपण जी यंत्रणा उभारली आहे, त्या यंत्रणेतील अगदी शेवटच्या इसमापासून तो या यंत्रणेतील प्रमुख जागांवर असलेल्या व्यक्तीपर्यंत सर्वांच्या सहकार्यावर आणि परस्परांच्या विचारांच्या व भावनेच्या देवाघेवाणीवर विसंबून, हे काम पार पाडावयाचे आहे''.[१९]

**१३) लोकमताला प्राधान्य द्यावे :-**

नेत्याने स्वत:ला वाटते म्हणून एखादा निर्णय घेण्यापेक्षा त्याचा कार्यकर्त्यावर काय परिणाम होईल किंवा निर्णय घेताना कार्यकर्त्यांचा विचार घेऊन निर्णय घ्यावा हे त्यांनी उपयोगात आणले. ''राजकारणातील प्रश्न हे सर्व जनतेशी निगडीत असतात. म्हणून राजकारणी माणसाला लोकशाहीमध्ये अशा सार्वजनिक विषयावर आपले विचार लोकांसमोर मांडून लोकांना विश्वासात घ्यावे लागते. त्यातून विचारप्रर्तन सरु होते. त्यामुळे सामान्य नागरिक स्वत:च्या प्रतिक्रिया देऊ लागतो. अशा मतप्रदर्शनातून शेवटी लोकमत तयार होते आणि त्यातून लोकशाहीतील अंतिम निर्णय घेतले जातात.''[२०] देशाच्या पुनर्रचनेसाठी जे जे काही करावयाचे त्यामध्ये आता सर्व वर्गाला, सर्व थरांना भाग घेण्याची संधी उपलब्ध करुन द्यावी लागेल. ''आजचे राजकारण समाजापासून दूर जात आहे.... याचे कारण कोणताही राजकीय नेता व पक्ष लोककारण करीत नाही. त्यांच्या राजकीय चळवळी डावपेचाच्या स्वरुपाच्या झाल्या आहेत. त्यामुळे त्यात सातत्य नाही. लोकांचे नेमके प्रश्न काय आहेत. त्यांचा लोकांत जाऊन अभ्यास न करता निर्णय घेतले जातात.''[२१]

**१४) लोकल्याणाची प्रेरणा अग्रस्थानी मानावी:-**

राजकीय सत्तेचा उपयोग लोककल्याणासाठी करायचा, ही यशवंतरावांच्या राजकारणाची मुख्य प्रेरणा होती. लोकांचे कल्याण व लोकांचे समाधान या दोन्ही कल्पना वेगवेगळ्या आहेत. ज्या गोष्टींनी लोकांचे तत्कालीन समाधान होईल त्या गोष्टी दीर्घकालीन लोकांच्या हिताच्या असतीलच असे नाही. लोकांचे दीर्घकालीन हित म्हणजे काय, ते कसे साधता येईल, त्यासाठी सरकारने काय करावे या विषयी यशवंतरावचे विचार अगदी पक्के होते. ''जनतेशी तादात्म्य साधण्याच्या मुलभूत नियमांचा आश्रय घेऊन आणि बहुजन समाजाच्या उपजीविकेचा आधार पुनरुज्वीत करुनच देशाला समृध्दीचे दिवस आणता येणार आहेत''.[२२]

**१५) राजकारण आणि राजकीय नेतृत्व :**

''राजकारण आणि राजकीय नेतृत्व हा एक लोकव्यवहार आहे. त्यात सत्ता मिळविण्यासाठी स्पर्धा ही चालणार आहे. प्रभावी पुढारी आपल्या विचारसरणीचे, आपल्या कार्यक्रमाचा आग्रह धरणारे गट करणार, हे ही आता उघड आहे. सत्ता मिळविणे किंवा तिची अभिलाषा धरणे

म्हणजे काही तरी पाप आहे, असे म्हणणारे लोक राजकारण करु शकणार नाहीत. कोणता तरी गट अडचणीत सापडला, की दुसरा गट पुढे येणार सत्ता संक्रमण हे आता असेच होत राहणार. वैयक्तिक हेवेदाव्यांसाठी उभारलेले गट हे केंव्हाही निंदय व त्याज्य समजावे लागतील.''[२३]

**यशवंतराव चव्हाणांच्या नेतृत्त्वाची गुणवैशिष्ट्ये**

सत्ता मिळविणे व टिकविणे हे सर्व राजकीय नेत व राजकीय पक्षांचे मुख्य उद्दिष्ट असले तरी या सत्तेचा उपयोग कसा व कशासाठी करायचा यावरुन निरनिराळ्या राजकीय नेते व राजकीय पक्ष यांच्यातील निराळेपणा स्पष्ट होतो. सत्ता कशासाठी या प्रश्नाचा विचार करताना याबाबत काय बोलले जाते, याबरोबरच प्रत्यक्षात होणारी कृती या बोलानुरुप होते का, याचाही विचार करावा लागतो. इतिहासक्रमात एखाद्या राजकीय नेतृत्त्वाचे योगदान ठरवताना त्याचे वैयक्तिक गण, दोष व त्याच्या कृती यांचा वाटा किती असतो व ज्या सामाजिक-आर्थिक परिस्थितीत ते वापरले, तिच्या होणाऱ्या अटळ परिणामांचे परिणाम किती प्रमाणात असते हा मुद्दा प्रत्यही उपस्थित होते या दोन घटकांपैकी कोणता हक्क जास्त महत्त्वाचा हा प्रश्न जटिल असला तरी ऐतिहासिक महत्त्वाच्या नेतृत्त्वाचा वर्तमान संदर्भात विचार करताना तो नेता ज्या सामाजिक, राजकीय चौकटीत वापरला त्या संदर्भात त्याचा विचार केला तरच वर्तमान सामाजिक राजकीय चौकटीत या नेतृत्त्वाचे विचार व त्याच्या कार्याचे महत्त्व यांचा समतोल विचार करणे शक्य होते.

**१) स्वकष्टार्जित नेतृत्त्व**

यशवंतरावांचे राजकीय नेतृत्त्व स्वकष्टार्जित होते. त्यांनी हेतूपुर्वक आपल्या व्यक्तिमत्वाची पद्धतशीरपणे आकारणी केली होती. यशवंतरावाच्या नेतृत्त्वरचनेत अनुवंशाचा भाग जवळपास नव्हताच. नेतृत्त्व निर्माण होण्यासाठी जे कौटुंबिक पर्यावरण, पैसा, प्रतिष्ठा, परंपरा वगैरेच्या स्वरुपात पोषक ठरत असते, ते यशवंतरावांच्या वाट्याला आलेले नव्हते. बहुजन समाजातून नव्या उमीदीने नवी ध्येये व आकांक्षा घेऊन पुढ येण्याची धडपड करीत असलेल्या तरुणांना यशवंतरावांच्या नेतृत्त्वाच्या उभारणीतून बरेच काही शिकायला मिळते.

**२) कुशल प्रशासक व संघटक**

''यशवंतराव हे कुशल प्रशासक होते हे त्यांचे टिकाकारही मान्य करतात. शिवाय ते कुशल संघटकही होते. त्यांनी विरोधी पक्षातील अनेकांशी जवळीक निर्माण केली. '' (पाटील रातु. यशवंतराव चव्हाण : एक कर्तबगार पण वादग्रस्त मुत्सुद्दी, राजे प्रकाशन, कोल्हापूर, १९८६, पृ. ७२) ''मीच त्यांच्यावर कटू व शिष्टाचार सोडून, सभ्य माणसाला न शोभणारे असे हल्ले केले, पण हे सारे खेळाडूपणाने पचवून मला खजील कले. शत्रूचा मित्र बनविले. मित्र हा शब्द कदाचित प्रौढी ठरेल. मला एक चाहता बनवल. (बागल (भाई) माधवराव, माझे यशवंतराव, समाज प्रकाशन, पुष्प ३ रे, कोल्हापूर, पृ. १४)

**३) वैचारिकदृष्ट्या प्रगल्भ**

यशवंतरावांची वैचारिक बैठक ही खूप पक्की होती. संस्कारक्षम वयातील चौफर वाचन, चिंतन आणि चर्चा यामुळे यशवंतराव चव्हाणांच्या राजकीय, सामाजिक जाणिवा बाल वयातच प्रगल्भ झाल्या होत्या. आपल्या आसपास घडणाऱ्या राजकीय व सामाजिक चळवळींचाही त्यांच्यावर परिणाम झालेला होता. त्यांनी अनेकांची व्यक्तीचरित्रे अभ्यासली होती. एम.एन. रॉय, महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरु यांच्या विचाराचा प्रभाव त्यांच्यावर होता. सातारा जिल्ह्यातील काँग्रेस कार्यकर्त्यापासून त्यांच्या राजकीय जीवनाची सुरुवात होऊन ही व्याप्ती राज्य व राष्ट्रीय पातळीवर वाढत गेली. राजकारणाशी, राज्यकारभाराशी त्यांचा निकटचा संबंध आला. साहजिकच त्याबद्दलचे चिंतनही ते करु लागले आणि प्रसंगपरत्वे आपले विचारही व्यक्त करु लागले. त्यांच्या या विचारांना राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिक असे विविध पैलू होते.

**४) उत्तम वक्ते**

यशवंतरावांच्या व्यक्तीमत्वाची ठेवणच वैचारिक आणि व्यासंगी अशी असल्याने यशवंतराव कोणत्याही व्यासपीठावरुन जे बोलत असत ते अत्यंत मुद्देसूद, मर्मग्राही आणि प्रसंगोचित असायचे. प्रसंगावधान व समय सूचकता बाळगणाराा त्यांच्याइतका राजकीय पुढारी विराळाच. मुख्यमंत्री,

अर्थमंत्री, संरक्षणमंत्री इ. पदावरुन त्यांनी विधीमंडळात जी वेळोवेळी भाषणे केली, त्यातून त्यांचे संसदीय नैपुण्य पुरेपूर व्यक्त होते. विरोधी पक्ष सदस्यांना विश्वासात घेण्याचे त्यांचे आपले स्वत:चे खास तंत्र होते.

**५) विचारांना कृतीची जोड**

विचारांना कृतीची जोड देणे हे यशवंतराव चव्हाणांच्या नेतृत्त्वाचे वैशिष्ट्य होते. ते म्हणतात, ''विशाल आणि विधायक विचारांची स्वप्ने साकार करावयाची, प्रत्यक्ष कृतीने दर्शवायची, तर त्यासाठी आणखी काही आत्मसात करावे लागते. ज्यांनी आपली स्वप्ने साकार केली प्रत्यक्ष कृती केली त्यांनी आपले विचार मेंदूत अडकवून ठेवले नाहीत. ते रक्तात भिनवले. (प्रधान राम २०००) यशवंतरावांनी आपल्या राजकीय कारकिर्दीत आपल्या विचारांना कृतीत उतरविण्याचा प्रयत्न केला. म्हणूनच ते महाराष्ट्रात लोकमान्य टिळकानंतरचा लोकमान्य नेता म्हणून प्रसिद्ध पावले.

**६) यशवंतरावांचे नेतृत्त्व हे कॉंग्रेस संघटनेशी जोडले गेले होते**

कॉंग्रेसशिवाय मी एकटा काहीही करु शकत नाही. कॉंग्रेसचा झेंडा त्यांनी कधीही खांद्यावरुन उतरवला नाही. महाराष्ट्रामध्ये कॉंग्रेस बळकट करण्यासाठी कार्यकर्त्यांची वैचारिक प्रगल्भता वाढविण्यासाठी त्यांनी अनेक शिबीरे उपयोजित केली होती व मार्गदर्शन केले होते.

**७) यशवंतराव चव्हाण हे समन्वयवादी होते**

यशवंतरावांचा लोकशाहीवरती दृढ विश्वास होता. चर्चा व विचारविनिमय हा एखाद्या प्रश्नावरती लवकर उपाययोजनेचा सर्वोत्तम मार्ग आहे असे ते मानत. लोकशाही म्हणजे चर्चा, परस्परांशी विचारांची देवाणघेवाण असे ते मानत. लोकशाहीच्या मार्गाने प्रश्न सोडविण्यावर त्यांचा भर होता. सामुहिकपणे निर्णय घेत व त्या निर्णयाला विचाराची जोड देत असत. दुसऱ्यांना समजून घेणे, बोलण्याची संधी देणे, त्यांचे विचार समजून घेणे ही त्यांच्या नेतृत्त्वाची गुणवैशिष्ट्ये होती.

**८) बेरजेच्या राजकारणाची निती**

संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर महाराष्ट्राच्या राजकारणावर यशवंतरावांची अनेक वर्षे पकड कायम होती हे निर्विवाद. याचे श्रेय त्यांच्या सर्वांना बरोबर घेऊन जाण्याच्या राजकारण शैलीला देता येईल. यालाच बेरजेचे राजकारण म्हणतात. त्यांच्या या गोष्टीचा आज पुन्हा विचार करण्यासाठी नवा, वर्तमान संदर्भ नसेल तर ती फक्त भूतकाळातील घटनांची उजळणी ठरेल.

**९) आधुनिक मूल्याचा पुरस्कार करणारे नेते.**

संकुचित मर्यादांच्या पलीकडे पोहचलेले भारताचे भवितव्य त्याच्या आधुनिक स्वरुपात पाहणारे आणि आपल्या विचारांशी बांधीलकी मानणारे यशवंतराव चव्हाणांचे नेतृत्त्व होते. नवभारताची घडण आधुनिक मूल्यांच्या आधारे झाली पाहिजे, अशी त्यांची धारणा होती. म्हणूनच ते म्हणतात की, भारतीय ऐक्याचा मूलाधार भारताची राज्यघटना व तिने सर्वांना दिलेले समान नागरिकत्व हेच आहे. या नागरिकत्वाचा कळस म्हणजे आमची सार्वभौम संसद आहे. स्वातंत्र्यलढ्यात आम्ही ज्यासाठी लढलो त्या उदात्त तत्त्वांची ती प्रतिनिधीक संस्था आहे. एकदशीय भावना येथेच सदैव प्रज्वलित राहील. (प्रधान राम (२०००) शब्दाचे सामर्थ्य, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, पृ. २९०, २९३)

**१०) लोककल्याण हेच प्रमुख उद्दिष्ट**

सत्तेचा उपयोग लोककल्याणासाठी करायचा, हे यशवंतरावांच्या राजकारणाचे मुख्य उद्दिष्ट मानले, तर आजच्या काळात लोककल्याणासाठी काय करता येईल, याचा विचार नव्याने करावा लागेल. लोकांचे समाधान हेच प्रशासनाचे प्रमुख उद्दिष्ट असायला हवे ही भूमिका यशवंतरावांनी मुख्यमंत्री बनल्यावर घेतली. (प्रधान राम (२०००)

**११) लोकशाहीवरती विश्वास**

यशवंतराव चव्हाण यांचा लोकशाही मूल्यावरती संपूर्ण विश्वास होता. यशवंतराव चव्हाण लोकशाहीबद्दलचे सखोल चिंतन करताना लोकशाहीत नेतृत्त्वाची भूमिका काय असली पाहिजे, याबद्दलची विचार करतात. ते म्हणतात, ‘‘लोकशाही जमान्यात नेतृत्त्व करणाऱ्या नेत्याने लोकशाहीत जो नेता लोकांशी निरंतर सलग्न राहून लोकांचा आणि स्वत:चा आत्मविश्वास वाढवतो, त्यालाच लोक अराध्य दैवत मानतात. लोक व जनता यांच्यात खरेखुरे तादाम्य नांदले तर नेत्यांच्या शब्दाला ब्रह्मवाक्याचे रुप प्राप्त होते. (प्रधान राम (२०००) पृ. ४३६)

**समारोप □**

यशवंतराव चव्हाण यांचे भारताच्या व महाराष्ट्राच्या विकासातील योगदान खूप मोठे आहे. त्यांनी वेळोवेळी आपल्या भाषणामधून साहित्यामधून मांडलेले विचार महाराष्ट्रातील नवीन व पुढील पिढीला उपयुक्त आहेत. सद्यकालीन महाराष्ट्राच्या राजकारणात निर्माण झालेल्या विविध प्रश्नांची उत्तरे आपणास यशवंतराव चव्हाण यांच्या राजकीय भूमिकेचा व विचारांचा अभ्यास केल्यास नक्कीच सापडू शकतात. सद्यकालीन राजकीय नेतृत्व व नव्याने उदयास येणाऱ्या नेतृत्वाने यशवंतरावांच्या विचारांचा व कार्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन वाटचाल केली तर राजकारणाचे शुद्धीकरण होऊन लोककल्याणाचे उद्दिष्ट साधले जाईल.

**संदर्भ □**


१. चव्हाण□यशवंतराव□ऋणानुबंध□लेखसंग्रह□प्रेस्टिज प्रकाशन□पुणे १९७९□पृ.६०.
२. भोळे□भा.ल.□यशवंतराव चव्हाण राजकारण आणि साहित्य□पृ.६.
३. चव्हाण□यशवंतराव भूमिका□पृ.४९□५०.
४. पाटील डॉ.एन.डी.□शिवाजी विद्यापीठ□राज्यशास्त्र परिषद□दि.१६ व १७ मार्च २०१२ च्या अध्यक्षीय भाषणातून.स्थळ □राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज□कोल्हापूर.
५. चव्हाण□यशवंतराव सह्याद्रीचे वारे□पृ.१९७.
६. चव्हाण□यशवंतराव सह्याद्रीचे वारे□पृ.६.
७. चव्हाण□यशवंतराव सह्याद्रीचे वारे□पृ.१७७.
८. चव्हाण□यशवंतराव भूमिका□पृ.५६.
९. चव्हाण□यशवंतराव भूमिका□पृ.५४.
१०. चव्हाण□यशवंतराव भूमिका□पृ.५४.
११. देशमुख□शिवाजीराव यशवंतराव चव्हाण यांचे समीक्षा लेखन व भाषणे□पृ.१६१.
१२. चव्हाण□यशवंतराव सह्याद्रीचे वारे□पृ.१९८.
१३. चव्हाण□यशवंतराव सह्याद्रीचे वारे□पृ.१९९.
१४. चव्हाण□यशवंतराव भूमिका□पृ.११८.
१५. चव्हाण□यशवंतराव भूमिका□पृ.१०६□१०७.
१६. चव्हाण□यशवंतराव सह्याद्रीचे वारे□पृ.६.
१७. प्रधान□राम (सं)□शब्दांचे सामर्थ्य□अमेय प्रकाशन□पुणे २०००□पृ.३१८.
१८. चव्हाण□यशवंतराव भूमिका□पृ.१७५.
१९. चव्हाण□यशवंतराव सह्याद्रीचे वारे□पृ.१९६.
२०. चव्हाण□यशवंतराव भूमिका□पृ.९६.
२१. चव्हाण□यशवंतराव भूमिका□पृ.१२९.
२२. चव्हाण□यशवंतराव भूमिका□पृ.६७□६८.



**मारूती हजारे**
सं.भी.पाटील महाविद्यालय मंद्रुप